प्रस्तावित कामांची छायाचित्रे



कचरा कुंडी



दुर्ग पर्यटन



फोटोग्राफी



दुर्ग पर्यटन



निसर्ग पाऊलवाट



वन्यप्राण्यांचे पुतळे



वन्यप्राण्यांची चित्रे



वन्यप्राण्यांची चित्रे

वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक,
सहयाद्री व्याघ्र राखीव कोल्हापूर यांचे कार्यालय
2 रा मजला, चक्रवर्धक इमारत,मुख्य पोस्ट ऑफीस समोर, ताराबाई पार्क,कोल्हापूर-416 003
दूरध्वनी क्र.0231/2542766 Email ID cctwlkolhapur@mahaforest.gov.in

पत्र जा.क्र.अ/कक्ष-11/पुनर्वसन/प्र.क्र. 8(2022-23)/LAC/ 894 /2023-24 दिनांक 23/10/2023

प्रति,

1. मा.ना.श्री.शंभूराज देसाई, मंत्री, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य तथा पालक मंत्री, सातारा जिल्हा
2. मा. ना. श्री. उदय सामंत, मंत्री, उदयोग, महाराष्ट्र राज्य
3. मा.आ.श्री. मकरंद पाटील, वि.स.मतदार संघ वाई
4. मा.आ.श्री. शिवेंद्रसिंह अभयसिंह भोसले, वि.स.मतदार संघ सातारा
5. मा. आ.श्री. मानसिंगराव नाईक, वि.स.मतदार संघ शिराळा
6. मा.आ.श्री. विनय कोरे, वि.स.मतदार संघ शाहूवाडी पन्हाळा
7. मा.आ.श्री. शेखर निकम वि.स.मतदार संघ चिपळूण
8. जिल्हाधिकारी , कोल्हापूर/ सातारा/ सांगली/रत्नागिरी
9. उपवनसंरक्षक कोल्हापूर/सातारा/सांगली
10. विभागीय वन अधिकारी ,चिपळूण
11. प्रादेशिक व्यवस्थापन, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, पुणे
12. अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
13. उपविभागीय अधिकारी , पाटण
14. श्री. सुनिल भोईटे, मानद वन्यजीव रक्षक, सातारा
15. श्री. रोहन भाटे, मानद वन्यजीव रक्षक, सातारा
16. श्री. अजित पाटील, मानद वन्यजीव रक्षक, सांगली
17. श्री. रमण कुलकर्णी, मानद वन्यजीव रक्षक, कोल्हापूर
18. स्वप्नील पवार, मानद वन्यजीव रक्षक, कोल्हापूर
19. श्री. अनिरुध्द माने, मानद वन्यजीव रक्षक, कोल्हापूर
20. श्री. निलेश बापट, मानद वन्यजीव रक्षक, रत्नागिरी
21. श्री. गिरीष पंजाबी, वन्यजीव तज्ञ (WCT)
22. श्री. जीवन बोराटे, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ सोशल वर्क जकातवाडी, सातारा
23. श्री. सुनिल करकरे, नेचर संस्था, कोल्हापूर
24. श्री. शेखर मोहिते, प्राध्यापक विभाग प्रमुख वनस्पती शास्त्र विभाग, लालबहादुर शास्त्री महाविदयालय, सातारा
25. श्री. सुहास वायंगणकर, वन्यजीव तज्ञ कोल्हापूर तथा सदस्य राज्य वन्यजीव मंडळ
26. श्री. नरेंद्र शेलार, अध्यक्ष रोटरी क्लब, सेव्हन हिल्स, सातारा

विषय :- सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्राचे स्थानिक सल्लागार समितीच्या बैठकीचे इतिवृत्ताबाबत.

संदर्भ - 1. शासन निर्णय क्रमांक डब्ल्युएलपी-0523/प्र.क्र.173/फ-1, दिनांक 21 सप्टेंबर, 2023
2.या कार्यालयाकडील पत्र क्र. अ/कक्ष-11/पुनर्वसन/प्र.क्र.8(2022-23)/LAC/ 890, दिनांक 20/10/2023

उपरोक्त शासन निर्णयानुसार सह्याद्री व्याघ्र राखीव क्षेत्राचे स्थानिक सल्लागार समितीची बैठक विभागीय आयुक्त पुणे विभाग, पुणे यांचे अध्यक्षतेखाली **दिनांक 18 ऑक्टोबर, 2023 रोजी सकाळी 11.00 वाजता जिल्हाधिकारी सातारा यांचे कार्यालयातील सभागृहात** संपन्न झाली आहे. त्याअनुषंगाने बैठकीचे इतिवृत संदर्भिय पत्रान्वये विभागीय

Scanned with OKEN Scanner
CamScanner

आयुक्त पुणे विभाग, पुणे यांचे मान्यतेसाठी सादर करण्यात आले असून, त्यास त्यांनी मान्यता दिली आहे. सदर मान्यताप्राप्त इतिवृत्ताची प्रत याव्दारे सर्व माननीय समिती सदस्यांना तसेच निमंत्रित सदस्यांना पाठविण्यात येत आहे.

सोबत-वरीलप्रमाणे

(आर.एम.रामानुजम)
सदस्य सचिव,
स्थानिक सल्लागार समिती, सहयाद्री व्याघ्र राखीव
तथा
वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक,
सह्याद्री व्याघ्र राखीव,कोल्हापूर

प्रतिलिपी : विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रतिलिपी: व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई निमंत्रित सदस्य यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.
प्रतिलिपी : मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रतिलिपी: जिल्हा पोलीस अधीक्षक, सातारा निमंत्रित सदस्य यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.
प्रतिलिपी : उपसंचालक कोयना, सह्याद्री व्याघ्र राखीव, कराड / उपसंचालक चांदोली, सह्याद्री व्याघ्र राखीव, कराड यांना माहितीसाठी रवाना.
प्रतिलिपी : उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सातारा, निमंत्रित सदस्य यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.
प्रतिलिपी : सहाय्यक संचालक, नगररचना प्रादेशिक योजना, सातारा, निमंत्रित सदस्य यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.
प्रतिलिपी: सहाय्यक संचालक, नगररचना प्रादेशिक योजना, कोल्हापूर, निमंत्रित सदस्य यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.

Scanned with OKEN Scanner

CamScanner

दुसरा मजला, वनवर्धन इमारत मुख्य पोस्ट ऑफिस
समोर, ताराबाई पार्क, कोल्हापूर-416003

महाराष्ट्र शासन
वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सह्याद्री व्याघ्र राखीव
कोल्हापूर,
E mail-ccfwlkolhapur@mahaforest.gov.in ☎0231-2542766

जा.क्र.अ/सर्वे/LAC बैठक/ /2022-23 कराड दिनांक :- 19.10.2023

सह्याद्री व्याघ्र राखीवच्या "स्थानिक सल्लागार समिती" बैठक
जिल्हाधिकारी कार्यालय सातारा
दिनांक - 18 ऑक्टोंबर, 2023 रोजीच्या सभेचे इतिवृत

दिनांक 18 ऑक्टोंबर, 2023 रोजीची सकाळी 11.00 वा. सहयाद्री व्याघ्र राखीवच्या स्थानिक सल्लागार समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा येथे मा. सौरभ राव, विभागीय आयुक्त, पुणे यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सदर बैठकीकरिता खालीलप्रमाणे अधिकारी/ सदस्य उपस्थित होते.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव	विभाग	पदनाम
1	मा.सौरभ राव, विभागीय आयुक्त,पुणे (व्हीसीद्वारे)	पदसिध्द	अध्यक्ष
2	मा.ना.श्री. शंभूराज देसाई, मंत्री राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य तथा पालक मंत्री, सातारा जिल्हा (व्हीसीद्वारे)	व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील आमदार	सदस्य
3	वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सह्याद्री व्याघ्र राखीव, कोल्हापूर	पदसिध्द	सदस्य सचिव
4	श्री. जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी, सातारा (व्हीसीद्वारे)	पदसिध्द	सदस्य
5	श्री. मंटांडा राज दयानिधी, जिल्हाधिकारी, सांगली	पदसिध्द	सदस्य
6	श्री. राहुल रेखावार, जिल्हाधिकारी, कोल्हापूर	पदसिध्द	सदस्य
7	श्री. एच.आर.म्हेत्रे, तहसीलदार, जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे प्रतिनिधी	पदसिध्द	सदस्य
8	श्री. यू.एस.सावंत, उपसंचालक, (कोयना) सह्याद्री व्याघ्र राखीव, कराड	पदसिध्द	सदस्य
9	श्रीमती. स्नेहलता पाटील, उपसंचालक, (चांदोली) राष्ट्रीय उद्यान, कराड	पदसिध्द	सदस्य
10	श्री. वैभव बोराटे, विभागीय वन अधिकारी, चिपळूण यांचे प्रतिनिधी	पदसिध्द	सदस्य
11	श्री. सुनिल भोईट, मानद वन्यजीव रक्षक, सातारा	मानद वन्यजीव रक्षक	सदस्य
12	श्री.रोहन भाटे, मानद वन्यजीव रक्षक, सातारा	मानद वन्यजीव रक्षक	सदस्य
13	श्री. निलेश बापट, मानद वन्यजीव रक्षक, रत्नागिरी	मानद वन्यजीव रक्षक	सदस्य
14	श्रीमती मौसमी कोसे, प्रादेशिक व्यवस्थापन, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, पूणे	पदसिध्द	सदस्य
15	श्री. गिरिष पंजाबी, वन्यजीव तज्ञ (WCT)	वन्यजीव संशोधक	सदस्य
16	श्री. जीवन बोराटे, यशवंतराव चव्हाण स्कुल ऑफ सोशल वर्क, जकातवाडी, सातारा	सांमाजिक संशोधक	सदस्य
17	श्री. सुनिल करकरे, नेचर संस्था, कोल्हापूर	पर्यटन क्षेत्रातील तज्ञ	सदस्य
18	श्री. शेखर माहिते, प्राध्यापक, विभाग प्रमुख, वनस्पती शास्त्र विभाग, लालबहादूर शास्त्री महाविद्यालय,सातारा	स्थानिक पर्यावरण तज्ञ	सदस्य
19	श्री. नरेंद्र शेलार ,अध्यक्ष रोटरी क्लब सेव्हन हिल, सातारा	स्थानिक पर्यावरण तज्ञ	सदस्य
20	श्री. स.भी.गारे, सहाय्यक संशोधन अधिकारी, अपर आयुक्त,	आदिवासी विकास प्रकल्प,	पदसिद्ध

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner
CamScanner

	आदिवासी विकास, नाशिक यांचे प्रतिनिधी	घोडेगाव	सदस्य
21	श्री. के.एम. पाटील, पोलिस उपाधिक्षक सातारा	पोलिस विभाग, सातारा	निमंत्रित
22	डॉ. सारंग कुलकर्णी, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांचे प्रतिनिधी	महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ	निमंत्रित

बैठकीच्या सुरवातीस सदस्य सचिव, स्थानिक सल्लागार समिती, सहयाद्री व्याघ्र राखीव श्री.आर.एम.रामानुजम, यांनी दिनांक 21 सप्टेंबर, 2023 च्या शासन निर्णयाप्रमाणे सहयाद्री व्याघ्र राखीव करिता नव्यानेच पुर्नगठीत झालेल्या "स्थानिक सल्लागार समिती" च्या प्रत्यक्ष व ऑनलाईन वरून उपस्थित सर्व सदस्यांचे अभिनंदन केले तसेच स्थानिक सल्लागार समितीची उद्दिष्टे, कार्य आणि संनियंत्रण करावयाच्या विषयांबाबत माहिती दिली. सहयाद्री व्याघ्र राखीवचे निसर्ग पर्यटन धोरण आणि नियमन करण्याच्या दृष्टीने विषयानुसार चर्चा करणे व निर्णय घेणेबाबत सर्व सदस्यांना विनंती करून बैठकीस सुरूवात केली. त्याचे इतिवृत्त खालीलप्रमाणे...

अ.क्र.	विषय	तपशील
1	सहयाद्री व्याघ्र राखीव क्षेत्राच्या निसर्ग पर्यटन आराखडयास मान्यता देणे	सहयाद्री व्याघ्र राखीवच्या "व्याघ्र संवर्धन आराखडयाचा" भाग असलेल्या व नव्याने तयार करण्यात येत असलेल्या सन 2023 -24 ते सन 2032-33 या 10 वर्षाच्या आराखडयावर चर्चा करण्यात आली. तसेच, त्या आराखडयाच्या अनुषंगाने सहयाद्री व्याघ्र राखीवच्या निसर्ग पर्यटनास चालना मिळावी म्हणून सहयाद्री व्याघ्र राखीवने तयार करण्यात आलेल्या निसर्ग पर्यटन आराखडयावरती चर्चा करण्यात आली व समितीने आराखडयास मान्यता दिली. सदर आराखडयानुसार सहयाद्री व्याघ्र राखीवचे निसर्ग पर्यटनासाठी 07 निसर्ग पर्यटन झोन केलेले असून त्यापैकी 05 झोन सातारा जिल्हयात, 1 झोन सांगली जिल्हयात तर 01 कोल्हापूर जिल्हयात आहे. सदर 7 झोनच्या निसर्ग पर्यटन विकासासाठी तयार करण्यात आलेल्या निसर्ग पर्यटन प्रस्तावावर चर्चा करून मान्यता देण्यात आली.
2	मौजे गोकुळ तर्फे हेळवाक येथे महाराष्ट्र पर्यटन पोलीस्त प्रशिक्षण केंद्र व राज्य आपत्ती बचाव दल स्थापन करणे करीता स्थानिक सल्लागार समितीची मान्यतेसाठी प्रस्ताव.	मौजे गोकुळ तर्फ हेळवाक (कोयनानगर) ता.पाटण भुमापन क्रं. 25. 26, 27, 29, 31, 32, 33, 34, 35 मधील 41.77 हेक्टर आर जमिनी वरती नियोजीत महाराष्ट्र पर्यटन पोलिस प्रशिक्षण केंद्र व राज्य आपत्ती बचाव दल स्थापन करण्याकरिताच्या प्रस्तावाबाबत चर्चा करण्यात आली. पर्यावरण संवेदनशील क्षेत्रामध्ये किंवा अभयारण्य किंवा राष्ट्रीय उदयानापासून 10 कि.मी मध्ये येणा-या प्रकल्पांना पर्यावरण पुर्व मान्यता (Environment Clearance) लागते, अशा प्रकल्पांच्या बाबतीत प्रकल्पयंत्रणा यांनी राष्ट्रीय वन्यजीव मंडळाच्या स्थायी समितीची शिफारस घेणे आवश्यक असते तसेच वर्ग 'ब' मध्ये 20,000 चौ.मीं. किंवा 20,000 चौ.मी. पेक्षा जास्त आणि 1,50,000 चौ.मी. पेक्षा कमी बांधकाम क्षेत्राचा समावेश असल्यास पर्यावरण पूर्व 'मान्यता' घ्यावी लागते अशी तरतूद आहे, या बाबी समितीच्या निर्दशनास आणून दिल्या.याबाबत चर्चा होवून सदर प्रस्तावास प्रचलित नियम व अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात आली.
3	पर्यटन उदयोगांकडून कंझर्वेशन फी जमा करण्याबाबत	राज्याचा निसर्ग पर्यटन धोरणाबाबतचा शासन निर्णय दिनांक 09 नोव्हेंबर 2012 च्या अनुषंगाने व्याघ्र प्रकल्पाच्या भोवतालच्या क्षेत्रातील पर्यटन (सोईसुविधा) उदयोगाकडून प्रतिकक्ष / प्रतिमाह करिता कंझर्वेशन फी (संवंर्धन शुल्क) आकारण्याची तरतूद आहे. त्यानुसार सहयाद्री व्याघ्र राखीवच्या सभोवती आंबा, चांदोली, कोयना व बामणोली या भागात सदयस्थितीत खाजगी हॉटेलस् व रिसॉर्टस आहेत. त्यांचेकडून प्रचलित दराने कंझर्वेशन फी आकारणेबाबत चर्चा झाली. तसेच कोविड 19 पूर्वी काही रिसॉर्ट सदर फी काही प्रमाणात देत होते. कोविड 19 काळात व त्यानंतरही रिसॉर्टने फी दिलेली नाही यावर चर्चा करण्यात आली. स्थानिक गावकरी जे बफर झोनमधील रहिवासी आहेत त्यांचे होमस्टे व कम्युनीटीस्टे किंवा ग्रामपंचायतीच्या सामूहिक मालकीची पर्यटक निवास व्यवस्था यांना कंझर्वेशन फी मधून सूट देण्यात आली असल्याबाबतही समितीस अवगत करण्यात आले. कंझर्वेशन फी संबंधीतांकडून प्रत्येक त्रैमासिक संपताच 15

Scanned with OKEN Sca
Scanned with OKEN Scanner
CamScanner

		दिवसाच्या आत सहयाद्री व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानच्य बँक खात्यात जमा करणेबाबत असलेल्या शासन निर्णयाची तरतूद समितीस अवगत केली. मा. अध्यक्षांनी सहयाद्री व्याघ्र राखीवच्या भोवतीच्या रिसॉर्टची यादी बनविण्याच्या सूचना दिल्या तसेच कोविड 19 नंतर कंझर्वेशन फी जमा करणे आवश्यक असल्याबाबत समितीचे एकमत झाले आणि कंझर्वेशन फी जमा करणेबाबत नियमावली करण्याचे ठरले.
4	मौजे मुनावळे ता.जावली जि.सातारा येथे जागतिक दर्जाचे जल पर्यटन विकसित करण्याकरीता महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास जागा उपलब्ध करुन देणे व सहयाद्री व्याघ्र राखीव अंतर्गत क्षमता असणाऱ्या ठिकाणी जलपर्यटन करणेबाबत धोरण ठरविणे.	सहयाद्री व्याघ्र राखीव अंतर्गत येणारे जलाशय व नदयांमध्ये जलपर्यटनास मोठया प्रमाणात वाव असून सोईसुविधा विकसीत झाल्यास मोठया प्रमाणात स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होवू शकतात. परंतु, जलपर्यटनाचे उपक्रम हे प्रचलित नियमानुसार व वन्यप्राण्यांना उपद्रव होणारे नसावेत यावर चर्चा करण्यात आली. कोयना धरणाच्या शिवसागर जलाशयातील असलेली बंदी धरणाच्या भितीकडील क्षेत्र सोडून शिथिल केल्यामुळे उर्वरित शिवसागर जलाशयात आता पर्यटनाचे उपक्रम घेण्यासाठी योग्य नियोजन करण्याबाबत चर्चा झाली, दिनांक 06 ऑक्टोंबर, 2023 च्या महाराष्ट्र शासन ग्रहविभाग यांच्या अधिसूचनेनूसार कोयना धरणाच्या भितीकडील 7 कि.मी. व बफर क्षेत्रातील 2 कि.मी. चा भाग वगळता कोयना जलाशयातील निर्बंध शिथील झाल्यामुळे येथील जलपर्यटनास चालना मिळेल याबाबत मा.ना.श्री. शंभूराज देसाई, मंत्री राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य यांनी समितीच्या निर्दशनास आणून दिले. तसेच, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या जागतिक दर्जाचे जलपर्यटन करण्यासाठी व त्यातून स्थानिकांना रोजगार निर्माण करण्यासाठी मौजे मुनावळे ता.जावळी येथील रू. 45.38 कोटी असलेल्या प्रस्तावित प्रकल्पासही स्थानिक सल्लागार समितीने मान्यता दिली. वनविभागाच्या प्रचलित नियमांना धरून व वन्यप्राण्यांना कोणताही उपद्रव होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक असल्याची चर्चा झाली. त्यानुसार नियमावली तयार करण्यात याव्यात असे ठरले. वारणा धरणाच्या वसंत सागर जलाशयातही जलपर्यटनास परवानगी घेणेबाबत आवश्यक प्रस्ताव लवकरात लवकर पाठविण्याबाबत ठरले. त्याचबरोबर कोयना नदीत सुद्धा जलपर्यटनाच्या विविध उपक्रमाच्या प्रस्तावावर चर्चा झाली व सर्वेक्षण करून सदर उपक्रम करण्यास मान्यता देण्यात आली. त्याचप्रकारे वारणा नदीतही जलपर्यटनाचे सर्वेक्षण करून प्रस्ताव करण्याबाबत ठरले.
5	देशमुखवाडी आणि मोडकवाडी याठिकाणी भुस्खलन झालेल्या गावांचे पुर्नवसन करणेबाबत उपविभागीय अधिकारी पाटण उपविभाग पाटण यांचा प्रस्ताव	पाटण तालुक्यामध्ये जुले 2021 मध्ये अतिवृष्टीमुळे भुस्खलन होवनू बाधित झालेल्या मौजे मिरगाव, हुंबरळी, काटेवाडी या गावातील नागरिकांचे कायमस्वरूपी पुर्नवसन मौजे देशमुखवाडी येथील ग. नं. 11/ब/1 मधील 2.1672 हे. आर जमिनीमध्ये करणेबाबतच्या प्रस्तावावर बैठकीत चर्चा करणेत आली. सदर कामाकरीता वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सह्याद्री व्याघ्र राखीव, कोल्हापूर यांनी दि.11/07/2023 पत्रान्वये परवानगी दिली असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.. या प्रस्तावास स्थानिक सल्लागार समितीने बैठकीमध्ये मान्यता दिली.
6	बफर क्षेत्रातील निसर्ग पर्यटनामध्ये स्थानिकांचा सहभाग	नवजा क्षेत्रातील ओझर्डे धबधबा पर्यटन हे नवजा ग्रामपरिस्थितीकीय विकास समितीस चालवण्यास देण्याबाबतचा प्रस्ताव समिती समोर ठेवण्यात आला. सहयाद्री व्याघ्र राखीवच्या क्षेत्रातील पर्यटनातून स्थानिकांना रोजगार व विकासाच्या संधी मिळाव्या हाच उद्देश आहे. त्यामुळे सहयाद्री व्याघ्र राखीव क्षेत्रातील निसर्ग पर्यटन स्थळे, विविध सोईसुविधा तसेच उपक्रम चालवण्यासाठी ग्रामसभेची परवानगी घेवून ग्रामपरिस्थिती विकास समित्यांना देण्यास हरकत नसल्याबाबत समितीचे एकमत झाले. त्यानुसार नियमावली ठरविण्यात यावी तसेच याचा लाभ ठराविक लोकांना न होता सर्व गावाला विशेष करून महिला बचत गटांना होईल अशा पद्धतीने नियमावली बनविण्याचे मा. अध्यक्ष आणि मा.ना.श्री. शंभूराज देसाई, मंत्री राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य यांनी सूचविल्याप्रमाणे मान्यता देण्याचे ठरले.

Scanned with OKEN Scanner

CamScanner

7	सहयाद्री व्याघ्र राखीवच्या बफर क्षेत्राकरिता नियमावली (Draft Buffer Rules).	दिनांक 16 सप्टेंबर, 2015 च्या स्थानिक सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये सहयाद्री व्याघ्र राखीवच्या बफर क्षेत्राकरिता नियमावली (Draft Buffer Rules) तयार करून चर्चा करण्यात आली होती. त्यावर स्थानिक, लोकप्रतिनिधीकडून व इतर सहभागीदाराकडून आक्षेप घेण्यात आले होते. सदर नियमावली अंतिम करण्याबाबत समिती समोर विषय मांडण्यात आला. त्याचर सर्व लोकप्रतिनिधीशी चर्चा करूनच, सदर नियमावली पुढील स्थानिक सल्लागार समितीच्या बैठकीत मान्यतेस ठेवण्याचे ठरले.
8	महाराष्ट्र राज्याच्या साहसी पर्यटन उपक्रम धोरणा अंतर्गत साहसी पर्यटन उपक्रम आयोजन करणेस परवानगी मिळणेबाबत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुउददेशिय सामाजिक संस्था. मुनावळे ता.जावली जि.सातारा यांचा प्रस्ताव	डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय सामाजिक संस्था मुनावळे या संस्थेने बफर क्षेत्रात येत असल्यामुळे जमीन, हवा व पाणी या तिन्ही प्रकारातील साहसी पर्यटन उपक्रमास सहयाद्री व्याघ्र राखीव च्या गाभा व बफर क्षेत्रात साहसी पर्यटन उपक्रमास परवानगी मिळणेच्या प्रस्तावाबाबत बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. अशा प्रकारचे साहसी पर्यटन उपक्रमांचे प्रस्ताव परवानगी करिता पुढेही येण्याची शक्यता आहे. त्यामुळे याकरिता आवश्यक नियमावली करून त्यानुसार परवानगी देण्याचे ठरले.
9	इतर विषय	सहयाद्री व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्रात निसर्ग पर्यटन विषयक उपक्रम राबविताना प्रचलित नियमांचे उल्लंघन होवू नये आणि वने व वन्यजीवांना यामध्ये नेहमीच प्राधान्य राहिल, याकरिता आजच्या बैठकीत चर्चा झाले प्रमाणे विविध उपक्रमाकरिता नियमावली निर्धारित करूनच निसर्ग पर्यटनाचे विविध उपक्रम व सोईसुविधांना परवानगी देण्यात यावी व त्याकरिता मा.अध्यक्षांच्या मान्यतेने पुढील 15 दिवसात नियमावली अंतिम करण्याचे मा.ना.श्री. शंभूराज देसाई, मंत्री राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य यांनी सूचित केले त्याप्रमाणे विहित कालावधी नियमावली अंतिम करण्याचे ठरले.

अशा तऱ्हेने स्थानिक सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये प्रस्तावांवरती चर्चा करून मान्यता देण्यात आली. सभेच्या शेवटी उपस्थित सर्वांचे आभार मानून अध्यक्ष महोदयांनी सभा संपलेचे जाहीर केले.

(आर.एम. रामानुजम)
सदस्य सचिव, स्थानिक सल्लागार समिती,
तथा
सह्याद्री व्याघ्र राखीव, कोल्हापुर

(सौरभ राव)
अध्यक्ष, स्थानिक सल्लागार समिती,
तथा विभागीय आयुक्त पुणे

Scanned with OKEN Scan
Scanned with OKEN Scanner
CamScanner

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,

10/2, स्टार्की टाऊन, मंगळवारी बाजार, सदर, नागपूर 440 001
दुरध्वनी क्रमांक 0712-2978844
E-mail ID : mahaecotourism@mahaforest.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

ई-मेलद्वारे

विषय:-महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १०/११/२०२३ रोजी आयोजित २१ व्या सभेच्या कार्यवृत्तांता बाबत.

क्रमांक:व्यसं/मनिपविमं-सभा/प्र.क्र.१२१(भाग-५)/२३-२४/ 945

नागपूर: ४४० ००१, **दिनांक** : 23 /११/२०२३

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) तथा अध्यक्ष कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, महाराष्ट्र राज्य, नागपूर.

२. प्रधान मुख्य वनसंरक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी (महाकॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.

३. व्यवस्थापकीय संचालक, एफडीसीएम लि.नागपूर तथा सदस्य कार्यकारी समिती किंवा त्यांचे प्रतिनिधी.

४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव),महाराष्ट्र राज्य,नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.

५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.

६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई तथा सदस्य, कार्यकारी समिती.

७. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पुर्व नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.

८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई तथा सदस्य, कार्यकारी समिती किंवा त्यांचे प्रतिनिधी.

९. श्री. अनिल सोले, GF-३, गंगोत्री अपार्टमेंट, बुटी लेआऊट, लक्ष्मीनगर, नागपूर-४४००२०

१०. श्री. प्रकाश मालाप्पाजी धारणे, कस्तुरबा चौक, बानापेठ, वार्ड नं.२, गिरनार हॉटेलजवळ, चंद्रपूर-४४२४०२

११. श्री. किरण पातुरकर, टोपे नगर, पवनस्कर लेआऊट, अमरावती-४४४६०२

CamScanner

१२. श्री. किशोर चिद्दरवार, हिमालया इनक्लेव्ह, मेझानी फ्लोव्हर १, नॉर्थ अंबाझरी रोड, अपोझीट एलएडी कॉलेज, शिवाजी नगर, नागपूर-४४००१०

१३. श्री. अरुण नारायण तिखे, २९, रघाताटे लेआऊट, दाताळारोड, रामनगर चंद्रपूर-४४२४०२

संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्रमांक:कक्ष-६/लले/व्यसं/कासभा/भाग-५/२३-२४/९०३ दिनांक ०८/११/२०२३

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीची २१ वी सभा, मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष कार्यकारी समिती, महराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १०/११/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता "कमांड कंट्रोल रुम", वनभवन, नागपूर येथे संपन्न झाली. सदर सभेचा कार्यवृत्तांत सोबत माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव सहपत्रीत करण्यात येत आहे.

सहपत्र:- वरील प्रमाणे.

23/11/2023

सदस्य-सचिव, कार्यकारी समिती तथा
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,
नागपूर (करीता)

प्रतिलिपी:-

१) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई/पुर्व नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता सादर.
२) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे /ठाणे/ चंद्रपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.
३) वनसंरक्षक (प्रादेशिक), छत्रपती संभाजीनगर/यवतमाळ/नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.
४) वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सहयाद्री व्याघ्र राखीव, कोल्हापूर /ताडोबा ,अंधारी व्याघ्र प्रकल्प-चंद्रपूरयांना आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.
५) उपवनसंरक्षक, पुणे/ सोलापूर/ पुसद/ रोहा/ वर्धा यांना आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.
6) विभागीय वन अधिकारीधाराशीव / बीड /,चंद्रपूर यांना आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.
7) उपविभागीय वन अधिकारी (वन्यजीव), आलापल्ली यांना आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

23/11/2023

सदस्य-सचिव, कार्यकारी समिती तथा
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,
नागपूर (करीता)

प्रत — कक्ष-२, योजना, मनिपविमं यांना सहपत्रांसह माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.

CamScanner

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या दिनांक १०/११/२०२३ रोजी संपन्न झालेल्या कार्यकारी समितीच्या २१ व्या सभेचा कार्यवृतांत

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीची २१ वी सभा दिनांक १० नोव्हेंबर, २०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांचे अध्यक्षतेखाली कमांड कंट्रोल रूम, वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे संपन्न झाली. सभेत उपस्थित कार्यकारी समिती सदस्य व आंमत्रित अधिका-यांची यादी (परिशिष्ट-१) नुसार सोबत जोडली आहे.

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ तथा सदस्य सचिव यांनी सभेच्या सुरूवातीला अध्यक्षांचे व उपस्थित सर्व सदस्यांचे तसेच नवनियुक्ती अशासकीय सदस्य व इतर अधिका-यांचे स्वागत केले व त्यानंतर अध्यक्षांचे परवानगीने विषयसुचीनुसार सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

सभेमध्ये सर्व विषयांवर सविस्तर चर्चा होऊन कार्यकारी समितीद्वारे खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

सादरीकरण संबंधित उपवनसंरक्षक/ विभागीय वनाधिकारी यांनी केले.

सर्व मंजूर प्रस्तावांना पुढील सर्वसाधारण अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूरी प्रदान केलेली आहे.

(१) वन संवर्धन कायदा, १९८०, भारतीय वन अधिनियम, १९२७ व वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ चे कोणत्याही प्रकारे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

(२) महाराष्ट्र राज्य वन पर्यटन धोरण व वन पर्यटनासंबंधी नियम, वेळोवेळी शासनाने निर्गमीत केलेले शासन निर्णय/ सूचना मंडळाद्वारे निर्गमीत मार्गर्शक तत्वे, सुचना ईत्यादी विपरीत कामे करता येणार नाही.

(३) प्रत्यक्ष कामें ही मंजुर आराखडयानुसारच होतील. कामाचे प्रकार किंवा स्वरुप किंवा नवीन कामे घ्यावयाची असल्यास सुधारीत आराखडा महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचेकडून मंजुर झालेनंतरच पुढील कार्यवाही करावी.

(४) राज्य शासनाचे साहसी पर्यटन उपक्रम धोरण-२०२१ मधील तरतूदि विचारात घेऊन आराखडयात साहसी पर्यटन उपक्रमांचा समावेश करावा. आराखडयामध्ये ४०% पेक्षा जास्त बांधकामे राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

CamScanner

(५) प्राचीन ऐतिहासीक स्मारके उदा. गड / किल्ले आदी यांचेशी संबंधित निसर्ग पर्यटनाची कामे करण्यापूर्वी संबंधित पुरातत्व विभागाची परवानगी प्राप्त करावी. अशी कामे ऐतिहासीक स्मारकाशी समरस होणारी असावीत याकरीता आवश्यक तांत्रीक मार्गदर्शन त्यांचे कार्यालयातील तज्ञांकडून घ्यावे.

विषय क्रमांक	विषय	समितीचे निर्णय
१	**दिनांक २१/०९/२०२३ रोजी झालेल्या २० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.**	यासंबंधी सविस्तर चर्चा होवून सर्वानुमते कार्यवृत्तांत कायम करण्यात आला.
२	**मंडळाच्या कार्यकारी समितीवर नवनियुक्त नामनिर्देशीत सदस्यांचे स्वागत**	मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांनी कार्यकारी समितीवर नवनियुक्त अशासकीय सदस्यांचे रोपटे देऊन स्वागत केले.
३	**निसर्ग पर्यटन विकास आराखडयांना मान्यता देणे.**	
३.१	**सह्याद्री व्याघ्र राखीव निसर्ग पर्यटन आराखडा, (वन्यजीव) कोल्हापूर वनविभाग** आराखडा किंमत रु. ८२०५.७६ लक्ष आराखडा कालावधी २०२३-२४ ते २०२७-२८	उत्तम आराखडा व सादरीकरणाचे समितीने कौतूक केले. आराखडयात नमूद कामांकरीता एम. टी. डी. सी. कडून ३२.०० कोटी / पी. डब्ल्यु. डी कडून २६.५० कोटी / डी.पी.डी.सी. कडून १.५० कोटी आाणि राज्यस्तरीय योजनेतून २२.०० कोटी निधी प्राप्त होणार असल्याचे सांगण्यात आले. ज्या क्षेत्रात पर्यटकांची संख्या जास्त आहे ती क्षेत्रे टप्पा १ मध्ये व उर्वरीत क्षेत्रांचा समावेश टप्पा २ मध्ये करण्याचा सुचना देण्यात आल्या. उपरोक्त अ.क्र. (१) ते (५) च्या अटीचे अधीन राहुन **आराखडयास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**
३.२	**डॉ. चिंतामणराव देशमुख जैवविविधता वन व वनस्पती उद्यान निसर्ग पर्यटन स्थळ, मौजे जामगाव, ता. रोहा वनविभाग, ठाणे** आराखडा किंमत रु. २००९.०२ लक्ष आराखडा कालावधी २०२३-२४ ते २०२७-२८	आराखडयात नमुद कामांकरीता डी.पी.डी.सी. मधुन निधी प्राप्त करुन घ्यावा. या अटींवर व उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) च्या अधीन राहुन **आराखडयास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

CamScanner

३.३	**वैद्यनाथ परळी पर्यटन स्थळ, बीड वनविभाग, छत्रपती संभाजीनगर** आराखडा किंमत रु. ७५३.६९ लक्ष आराखडा कालावधी २०२३-२४ ते २०२४-२५	उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) च्या अधीन राहुन व सदर निसर्ग पर्यटन स्थळाचे विकास कामांकरीता लागणारा निधी राज्यस्तरीय योजना व डी.पी.डी.सी. कडून उपलब्ध करुन घेणे या अटींवर **आराखडयास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**
३.४	**मौजे वडवळ नागनाथ येथे (संजिवनी बेट) व दुर्मिळ वनस्पतीचे संवर्धन निसर्ग पर्यटन स्थळ, धाराशीव वनविभाग, छत्रपती संभाजीनगर** आराखडा किंमत रु. ५१६.२३ लक्ष आराखडा कालावधी २०२३-२४ ते २०२५-२६	उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) च्या अधीन राहुन या अटींवर **आराखडयास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**
३.५	**कासोळा नियतक्षेत्रातील कक्ष क्रमांक ८१० मध्ये वन उद्यान निसर्ग पर्यटन स्थळ, पुसद वनविभाग, यवतमाळ** आराखडा किंमत रु. ४४७.०७ लक्ष आराखडा कालावधी २०२३-२४ ते २०२५-२६	उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) च्या अधीन राहुन व निधी डी.पी.डी.सी. कडून उपलब्ध करुन घेणे या अटींवर **आराखडयास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**
३.६	**मौजे गुन्होळी राखीव वनक्षेत्र क.नं.५४० निसर्ग पर्यटन स्थळ, पुणे वनविभाग, पुणे** आराखडा किंमत रु. ३१८.६३ लक्ष आराखडा कालावधी २०२३-२४ ते २०२५-२६	सदर आराखडायातील बाब क्र.२५ (ओपन जिम) वगळण्यात येत आहे. उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) च्या अधीन राहुन व निधी डी.पी.डी.सी. कडून उपलब्ध करुन घेणे या अटींवर **आराखडयास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**
३.७	**मौजे गुन्होळी राखीव वनक्षेत्र क.नं.५४० निसर्ग पर्यटन स्थळ, पुणे वनविभाग, पुणे** आराखडा किंमत रु. ३०८.९९ लक्ष आराखडा कालावधी २०२३-२४ ते २०२४-२५	सदर आराखडायातील बाब क्र.२५ (ओपन जिम) वगळण्यात येत आहे. उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) च्या अधीन राहुन व निधी डी.पी.डी.सी. कडून उपलब्ध करुन घेणे या अटींवर **आराखडयास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**
३.८	**मौजे मातेरेवाडी फॉरेस्ट क.नं.१६७ बापूजीबूवा देवस्थान, पुणे वनविभाग, पुणे क्षेत्र : 4.84 हेक्टर** आराखडा किंमत रु. ५४०.०० लक्ष आराखडा कालावधी २०२३-२४ ते २०२४-२५	सदर आराखडायातील बाब क्र.५३ (ओपन जिम) वगळण्यात येत आहे. उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) च्या अधीन राहुन व निधी डी.पी.डी.सी. कडून उपलब्ध करुन घेणे या अटींवर **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

CamScanner

३.९	**मौजे आतवण फॉ.स.नं.३७ येथे लायन्स पॉईंट व टायगर पॉईंट (स्काय वॉक) तयार करणे, पुणे वनविभाग, पुणे** आराखडा किंमत रु. ७७३२.९० लक्ष आराखडा कालावधी २०२३-२४	सदर आराखडयात नमूद कामासंबंधात पर्यटकांची सुरक्षा, भुवैज्ञानिक अभ्यास, व्यवहार्यता अभ्यास तसेच सदर क्षेत्रातील तिव्र वायुगती विचारात घेणे आवश्यक आहे. सदर कामे अत्यंत तांत्रीक स्वरुपाची आहेत. वनविभागाला अश्याप्रकाची कामे करण्याचा अनुभव नाही. त्यामुळे सदर प्रकल्प PMRDA किंवा समकक्ष संस्थेस सोपविणे योग्य राहील. राज्य शासनाचे साहसी पर्यटन उपक्रम धोरण – २०२१ मधील तरतुदी विचारात घ्याव्या. तसचे सदर कामांकरीता वनसंवर्धन अधिनियमातील तरतुदिंनुसार पुर्व मंजूरी घेणे आवश्यक राहील या अटींचे अधिन सदर **आराखडयास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**
३.१०	**मौजे गारवाड गट नं. ३९३ निसर्ग पर्यटन स्थळ, सोलापूर वनविभाग, पुणे** आराखडा किंमत रु. ९३.५० लक्ष आराखडा कालावधी २०२३-२४	उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) च्या अधीन राहुन DPDC योजने मधून विकास कामांकरीता आवश्यक निधी उपलब्ध करुन घेणे या अटींवर **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**
३.११	**मौजे रेडे गट नं. ५१ निसर्ग पर्यटन स्थळ, सोलापूर वनविभाग, पुणे** आराखडा किंमत रु. ७२.०० लक्ष आराखडा कालावधी २०२३-२४	उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) च्या अधीन राहुन DPDC योजने मधून विकास कामांकरीता आवश्यक निधी उपलब्ध करुन घेणे या अटींवर **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**
३.१२	**मौजे खारवडे फॉ. कं. नं. ३३ येथील वन उद्यान, पुणे वनविभाग, पुणे** आराखडा किंमत रु. २३३.३६ लक्ष आराखडा कालावधी २०२३-२४	उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) च्या अधीन राहुन व निधी डी.पी.डी.सी. कडून उपलब्ध करुन घेणे या अटींवर **आराखडयास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**
३.१३	**मौजे सालोड (हिरापूर) येथे निसर्ग पर्यटन विकास, वर्धा वनविभाग, नागपूर** आराखडा किंमत रु. २२२६.४२ लक्ष आराखडा कालावधी २०२३-२४ ते २०२४-२५	काटेरी कुंपणाऐवजी चेनलिंक कुंपण करावे. तसेच उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) च्या अधीन राहुन व निधी डी.पी.डी.सी. कडून उपलब्ध करुन घेणे या अटींवर **आराखडयास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**
३.१४	**धन्नुर तलाव, मौजा चपराळा, ता. चार्मोशी, निसर्ग पर्यटन स्थळ, गडचिरोली** आराखडा किंमत रु. ६२७.७२ लक्ष आराखडा कालावधी २०२३-२४	उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) च्या अधीन राहुन **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

CamScanner

४	अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर उपस्थित विषय	
४.१	**भवानी टेकडी वन उद्यान, पुसद वनविभाग, यवतमाळ** आराखडा किंमत रु. ९९६.४८ लक्ष आराखडा कालावधी २०२३-२४	सदर आराखडयात नमूद कामांकरीता आवश्यक निधी MTDC कडून प्राप्त होणार आहे. रुपये २००.०० लक्षचा निधी प्राप्त झाला आहे व प्रकल्पास शासनाची प्रशासकीय मान्यता देखील प्राप्त झाली असल्याचे सांगण्यात आले. सदर आराखडयामध्ये संकल्प नकाशा, संकल्पीत कामे दर्शविणारा नकाशा नाही. साहसी पर्यटनाकरीता शासनाच्या साहसी पर्यटन धोरणानुसार आवश्यक कार्यवाही करावी. तसेच सदर क्षेत्रात कार्यकारी समितीचे तज्ञ सदस्य श्री. किशोर चिद्दरवार यांचे मार्गदर्शनांत सुधारीत संकल्प आराखडा मंडळाकडे १५ दिवसात सादर करावा या अटिंवर उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) च्या अधीन राहुन **आराखडयास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**
४.२	**ईको पार्क, वरोरा, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर** आराखडा किंमत रु. ३६६.०० लक्ष आराखडा कालावधी २०२३-२४	उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) च्या अधीन राहुन **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**
४.३	**बालोद्यान रामबाग परिसर, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर** आराखडा किंमत रु. २५०.०८ लक्ष आराखडा कालावधी २०२३-२४	उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) च्या अधीन राहुन **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**
४.४	**पंडीत दिनदयाल उपाध्याय इको पार्क, मुल, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर** आराखडा किंमत रु. १९४.७१ लक्ष आराखडा कालावधी २०२३-२४	उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) च्या अधीन राहुन **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**
४.५	**अजयपूर निसर्ग पर्यटन स्थळ, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर** आराखडा किंमत रु. २२९.९७ लक्ष आराखडा कालावधी २०२३-२४	उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) च्या अधीन राहुन **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**
४.६	**मोहर्ली गेट मिनी थेटर** आराखडा किंमत रु. ५३४.०० लक्ष आराखडा कालावधी २०२३-२४	उपरोक्त अ.क्र. (१) ते (४) च्या अधीन राहुन **आराखडयास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

CamScanner

कार्यकारी समितीच्या सुचना :-

१) कार्यकारी समिती समक्ष सदरीकरण करण्यात येत असलेले बहुतेक आराखडे निसर्ग पर्यटन धोरण व मंडळाकडून देण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांचे अनुषंगाने तयार करण्यात येत नसल्याचे मत कार्यकारी समितीने व्यक्त केले.

२) बहुतेक आराखडयामध्ये निसर्ग पर्यटन विकासाकरीता वनउद्यानांचे प्रस्ताव प्राप्त होत आहेत. अशा प्रकारच्या विकास आराखडयांमध्ये विविध प्रकारची रोपवने, औषधी वनस्पती रोप वाटीका व जास्तीत जास्त प्रमाणात वानीकी कामे व निसर्ग शिक्षण संबंधी निसर्ग विषयक बाबींचा समावेश करण्यात यावा. ग्रीन जिम, बालोद्यान, वन्यप्राण्यांचे पुतळे व कृत्रीम निसर्ग पायवाटा, कंपॉऊड वॉल ईत्यादी अनावश्यक बांधकामे टाळण्यात यावे. अशा सुचना देण्यात आल्या.

३) मंडळाद्वारे सन २०१६-१७ पासून राज्यातील बऱ्याच निसर्ग पर्यटन स्थळाच्या आराखडयांना मान्यता प्रदान केली आहे. तसेच शासनाद्वारे २४०६-२२९५ या लेखाशिर्षा अंतर्गत निसर्ग पर्यटन स्थळाच्या विकास कामांना निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. या निधीद्वारे करण्यात आलेल्या विकास कामांचे मुल्यांकन होणे आवश्यक असल्याचे मत अध्यक्षांनी व्यक्त केले व सदर मुल्यांकन वन विभागाचे मुल्यांकन विभागाद्वारे करण्याकरीता आवश्यक पाठपूरावा करण्याबाबत सुचना देण्यात आल्या.

मूळ प्रत अ.मु.व.सं. तथा व्य.सं. द्वारा मंजुर

23/11/2023

सदस्य-सचिव, कार्यकारी समिती तथा
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,
नागपूर (करीता)

CamScanner

परिशिष्ट -१

दिनांक १० नोव्हेंबर, २०२३ रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीच्या २१ व्या सभेमध्ये उपस्थितांची यादी

अ.क्र.	अधिकाऱ्यांचे नांव	समिती मधील पद	पदनाम
१	श्री. एस.जी. टेंभुर्णीकर	अध्यक्ष	प्रधान मुख्य वनसंरक्षक(वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती महाराष्ट निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर
२	श्री. महीप गुप्ता	सदस्य सचिव	व्यवस्थापकीय संचालक, तथा सदस्य सचिव, कार्यकारी समिती, महाराष्ट निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर
३	श्री. प्रविण चव्हाण	सदस्य	अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर
४	श्री. राजन तलमले	सदस्य	प्रधान मुख्य वनसंरक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी (महाकॅम्पा), महाराष्ट्र राज्य,नागपूर यांचे प्रतिनिधी
५	श्री. राजेश तिवारी	सदस्य	व्यवस्थापकीय संचालक, एफ.डी.सि.एम., नागपूर यांचे प्रतिनिधी
६	श्रीमती प्रतिभा बोदेले	सदस्य	व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई/नागपूर त्यांचे प्रतिनिधी.
७	श्री. अनिल सोले	अशासकीय सदस्य	अशासकीय सदस्य, कार्यकारी समिती
८	श्री. प्रकाश धारणे	अशासकीय सदस्य	अशासकीय सदस्य, कार्यकारी समिती
९	श्री. किशोर चिद्दरवार	अशासकीय सदस्य	अशासकीय सदस्य, कार्यकारी समिती
१०	श्री. अरूण तिखे	अशासकीय सदस्य	अशासकीय सदस्य, कार्यकारी समिती
११	श्री. नरेन्द्र चांदेवार		उप महाप्रबंधक, महाराष्ट निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर
१२	श्री. महादेव मोहिते		उप वनसंरक्षक, पुणे वनविभाग, पुणे
१३	डॉ. बी.एन. स्वामी		उप वनसंरक्षक, पुसद वनविभाग, पुसद
१४	श्री. उत्तम सावंत		उपसंचालक, कोयना सह्याद्री व्याघ्र राखीव, कराड
१५	श्री. अमरजीत पवार		सहाय्यक वनसंरक्षक, वर्धा वनविभाग, वर्धा
१६	श्री. अ.प्र. पवार		सहाय्यक वनसंरक्षक, भामरागड, चपराळा वन्यजीव अभयारण्य
१७	श्री. किशोर मिश्रीकोटकर		उप महाप्रबंधक (कं.), महाराष्ट निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर

CamScanner

आभासी V.C. व्दारे सभेस उपस्थितांची यादी			
१	श्रीमती श्रीलक्ष्मी ए .		वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर
२	श्री. अप्पासाहेब निकत		उप वनसंरक्षक, रोहा वनविभाग, रोहा
३	श्री. धैर्यशिल पाटील		उप वनसंरक्षक, सोलापूर वनविभाग, सोलापूर
४	श्री. ए.बी. गर्कल		विभागीय वन अधिकारी, बीड वनविभाग
५	श्री. प्रशांत खाडे		विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर

CamScanner

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,

10/2, स्टार्की टाऊन, मंगळवारी बाजार, सदर, नागपूर 440 001
दुरध्वनी क्रमांक 0712-2978844
E-mail ID : mahaecotourism@mahaforest.gov.in

ई-मेलद्वारे

क्रमांक : कक्ष-2/यो/प्र.क्र.141(2)/सहयाद्री व्या.प्र./23-24/1087 **दिनांक** : 01 / 01 /2024

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(अर्थसंकल्प, नियोजन व विकास),
महाराष्ट्र राज्य, नागपूर

विषय : राज्य योजना सन 2023-24
निसर्ग पर्यटन (2406-2295) या योजने अंतर्गत सहयाद्री व्याघ्र राखीव कोयना अभयारण्य नवीन बाब प्रस्ताव सादर करणेबाबत.

संदर्भ : 1) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई यांचे पत्र क्रमांक कक्ष-2/योजना/930/2023-24 दिनांक 21/12/2023
2) आपले कडील पत्र क्रमांक कक्ष-1/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.20/334/23-24 दि.31/07/2023

वार्षिक योजना सन 2023-24 करीता निसर्ग पर्यटन योजना (2406-2295) अंतर्गत रुपये 10000.00 लक्षचा नियतव्यय अर्थसंकल्पीत करण्यात आलेला आहे. यापुर्वी **रुपये** 7400.68 **लक्षचे** प्रस्ताव सादर केले आहे. त्यापैकी **रुपये** 3685.86 लक्षच्या निधीस शासन मंजूरी प्राप्त झालेली आहे.

संदर्भिय पत्र क्रमांक 1 अन्वये प्राप्त झालेला **सहयाद्री व्याघ्र राखीव कोयना अभयारण्य** या निसर्ग पर्यटन स्थळाकरीता **रुपये** 1107.20 लक्षचा नवीन बाब प्रस्ताव मंजुर आराखडयानुसार तपासला असता प्रपत्र "ब" मध्ये नमुद असलेल्या रुपये 1107.20 लक्षच्या कार्यबाबी आराखडयात समाविष्ट असून आवश्यक त्या कार्यबाबींना तांत्रीक व प्रशासकीय मान्यता दिल्याचे प्रपत्र "ब" मध्ये नमुद आहे. संदर्भिय पत्र क्रमांक 2 अन्वये सादर केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

1) सदर निसर्ग पर्यटन स्थळाचा आराखडा महाराष्ट्र निसर्ग पर्यटन मंडळाच्या दिनांक 10/11/2023 रोजी कार्यकारी समितीच्या सभेत सन 2023-24 ते 2027-28 या वर्षासाठी मंजूर झालेला आहे.
2) सदर निसर्ग पर्यटन स्थळाच्या आराखडयाची एकुण रक्कम रु.8205.76 लक्ष आहे.
3) सदर निसर्ग पर्यटन स्थळ नवीन बाब असल्यामुळे अनुदान वाटप करण्यात आले नाही.
4) सदर निसर्ग पर्यटन स्थळाचा कार्यबाबी प्रस्तावातील प्रपत्र "ब" नुसार आहे.

CamScanner

मंजुर आराखडयानुसार सन 2023-24 साठी प्राप्त झालेल्या **रुपये** 1107.20 **लक्षचे** प्रस्तावाची शिफारस खालील प्रमाणे करण्यात येत आहे.

प्रस्तावाचे विवरण

(रु. लाखात)

अ. क्र.	नियंत्रक अधिकारी	निसर्ग पर्यटन स्थळाचे क्षेत्र	प्राप्त प्रस्ताव	शिफारस न केलेली रक्कम	शिफारस केलेली रक्कम
1	अप्रमुवसं (वन्यजीव), पश्चिम मुंबई	**सहयाद्री व्याघ्र राखीव कोयना अभयारण्य**	1107.20	-	1107.20

सदर योजने वर होणारा खर्च लेखाशिर्ष निसर्ग पर्यटन (2406-2295) अंतर्गत उपलब्ध तरतूदीमधुन भागविण्यात येईल.

सबब सदर नवीन बाब प्रस्ताव सहयाद्री व्याघ्र राखीव कोयना अभयारण्य **रुपये** 1107.20 लक्षसाठी शिफारशीसह दोन प्रतीत शासनाकडून मंजूरी प्राप्त करणेस्तव सादर.

सहपत्र : वरील प्रमाणे

(महीप गुप्ता)
व्यवस्थापकीय संचालक
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ
नागपूर

प्रतिलिपी : अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई यांना माहिती करीता अग्रेषित.

प्रतिलिपी : वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सहयाद्री व्याघ्र राखीव, कोल्हापूर यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहितीस्तव अग्रेषीत. तसेच कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रासोबत सादर केलेल्या प्रस्तावा सोबत **सन 2023-24 मध्ये मासीक निधी वाटपाचे विवरणपत्र उलटटपाली या कार्यालयास सादर करावे.** तसेच सदर प्रस्तावात अंतर्भुत असलेल्या कार्यबाबींना राज्य शासनाची मंजूरी प्राप्त होईपर्यंत कामांना सुरुवात करु नये. त्यांनी प्रस्तावीत केलेल्या कार्यबाबीचा अमल करतांना मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेश, वनसंवर्धन कायदा 1980, भारतीय वन अधिनियम-1927, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम-1972, जैवविविधता कायदा 2002, पर्यावरण (संरक्षण) कायदा 1986 व इतर अस्तित्वात असलेले अधिनियम व नियम तसेच मार्गदर्शन सुचनांचे उल्लंघन होणार नाही खबरदारी घ्यावी. **तसेच आतापर्यंत झालेल्या विकास कामामुळे पर्यटक संख्येत किती वाढ झाली, किती राजस्व प्राप्त झाला व किती स्थानीकांना रोजगार प्राप्त झाला तसेच निसर्ग पर्यटन स्थळाची विकास कामे पुर्ण झाल्यानंतर सदर प्रकल्प स्वयंचलीत (Self Sustainable) होण्याच्या दृष्टिने आपणातर्फे काय व्यवस्था / कार्यवाही करण्यात येत आहे. याबाबत माहिती उलटटपाली सादर करावी. तसेच प्रकल्प कामांचे Geotag फोटो सुध्दा सादर करावे.**

वरील प्रस्तावात समाविष्ट असलेल्या साहित्याची खरेदी G.E.M. प्रणालीद्वारा किंवा ई-निविदा काढूनच करावी. विविध ठिकाणी असलेल्या बांधकामची एकत्रीत रक्कम रुपये 3.00 लक्ष पेक्षा जास्त असल्यास ई-टेंडर प्रणालीचा अवलंब करुनच बांधकामे करण्यात यावी.

प्रत : प्रस्ताव फाईल करीता

CamScanner

Ozarde Waterfall



महाराष्ट्र वन विभाग

SAHYADRI TIGER RESERVE

सह्याद्री व्याघ्र राखीव, कोल्हापूर

वनवर्धन,मुख्य पोस्ट ऑफिससमोर, ताराबाई पार्क,कोल्हापूर – ४१६ ००३
फोन : ०२३१-२६५३६३२ फॅक्स : ०२३१-२६५९२३३
इमेल : ccfwlkopstr@mahaforest.gov.in